# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४१/(१०)/आ.४/ ५२/२०१८ दिनांक : १६.४.२०१८

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.२७ मार्च, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४१व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दि.२७ मार्च, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४१व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

१६.४.१८

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

प्रत : खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.
प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.
उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.
उप मुख्य लेख्याधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी/कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) मजीप्रा मुंबई/सि.भ. नवी मुंबई.

सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयात सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकणाच्या १४१ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४१ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. बबनराव लोणीकर याच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.सदाभाऊ खोत, राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) श्री.शामलाल गोयल, अपर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.
५) प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी श्री.प्र.पुं.बडगेरी, उपसचिव,
६) प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे प्रतिनिधी श्री.यशवंत बुधवंत, कक्ष अधिकारी,

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मु.) म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) म.जी.प्रा. मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**कार्यसूची बाब क्र.१ :** म.जी.प्रा. च्या १४० व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकणाच्या संचालक मंडळाची १४० वी सभा दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४० व्या सभेच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यसूची बाब क्र.२ :** म.जी.प्रा. च्या १४० व्या बैठकीमध्ये ठेवण्यात आलेल्या कार्यक्रम बाबींवर करण्यात आलेली कृती.

म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाच्या दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या १४०व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४० व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यसूची बाब क्र.३:** म.जी.प्रा.च्या सन २०१४-१५च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१४-१५ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. यावर मा.अपर मुख्य सचिव, पा.पु. व स्वच्छता यांनी म.जी.प्रा.चा सन २०१५-१६ व २०१६-१७ चे प्रशासनिक अहवाल पुढील तीन महिन्यात सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

चर्चेअंती म.जी.प्रा.च्या सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**कार्यक्रम बाब क्र.४** : म.जी.प्रा. च्या सन २०१४-१५ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.

सदर प्रस्तावाविषयी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले की, म.जी.प्रा.च्या सन २०१४-१५ च्या वार्षिक लेख्यांना संचालक मंडळाच्या १३७ व्या सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. सदर सन २०१४-१५ च्या वार्षिक लेखे आता महालेखापाल मुंबई कार्यालयाकडून प्रमाणित करण्यात आलेले आहेत.

प्राधीकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालांनी प्रमाणित केलेले लेखे व लेखापरिक्षण अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यात येतात. त्या दृष्टीने मा.संचालक मंडळाच्या दि.२७.३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या १४१ व्या बैठकीमध्ये चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

प्राधिकरणाच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१४-१५ चे वार्षिक लेखे या लेखा परिक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.५** : न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना, टप्पा-१, ता. पनवेल, जि. रायगड.
पाण्याची पाईप लाईन फुटून विट भट्टीच्या झालेल्या नुकसान भरपाईबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

या योजनेची देखभाल दुरुस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहे. दि.९.३.२०१२ रोजी रात्री १२:०० वा. सुमारास जे.एन.पी.टी. कडे जाणारी उरण-पनवेल रस्त्यावरील मजीप्राची पाईपलाईन ही कोल्ही बस स्थानकासमोरील मौजे पारगाव येथे अचानक फुटल्याने श्री.नारायण गणू नाईक वगैरे ८ यांचे नावे असलेल्या मौजे पारगाव येथील सर्वे नं.७८/४ या जमिनीरील श्री. बाबुराव बाळू भगत यांच्या विटभट्टीचे नुकसान झाले आहे. सदर नुकसानीच्या तहसिलदार पनवेल मार्फत प्राप्त पंचनाम्याचा अहवाल यांच्याकडून प्राप्त झाला आहे.

मजीप्राच्या मा.संचालक मंडळाच्या १३२ व्या बैठकीमध्ये प्राप्त सूचनेनुसार संबंधित वीटभट्टी अधिकृत असल्याची खातरजमा करुन घेण्यात आली आहे. त्यामुळे मजीप्राच्या अधिनियम कलम-६३ नुसार नुकसान

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

भरपाईचा प्रस्तावास मा.संचालक मंडळाची मान्यता प्राप्त होण्यासाठी सदर बैठकीत चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्राच्या मालकीच्या न्हावा शेवा उप प्रादेशिक पाणी पुरवठा योजना टप्पा-१ च्या उपरोक्त प्रस्तावानुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे दि.९.३.२०१२ रोजी सर्वे नं.७८/४ मौजे पारगाव येथे पाईप लाईन आकस्मिक फुटल्याने श्री. बाबुराव बाळू भगत यांचे विटभट्टीचे नुकसान भरपाईची रक्कम रु.४,२९,५००/- (रु.चार लाख एकोणतीस हजार पाचशे मात्र) देण्यात यावी. त्याप्रमाणे सदरची नुकसान भरपाई ही न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्ती निधीमधून देण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.६** : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पूरता, शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुंतवावी याबाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवचणूका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

आता दि.८.९.२०१७ ते दि.१५.३.२०१८ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, दि.८.९.२०१७ ते दि.१५.३.२०१८ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.७** : नागरी पाणी पुरवठा योजनासाठी आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीस स्थगिती मिळणेबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

म.जी.प्रा.कडे महानगरपालिके/ नगरपालिकेकडून वेळेवर कर्जाची परतफेड होत नसल्याने मजीप्राने आयुर्विमा महामंडळास कर्जफेडीपोटी अदा करावयाची दि.१.१२.२०१७ व १.३.२०१८ रोजीची देय रक्कम (मजीप्रा हिस्सा + मनपा/ न.पा. प्राप्त रक्कम) प्रदान करण्यास स्थगित केलेले आहे. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे आयुर्विमा महामंडळाची थकीत रक्कम एकरकमी अदा करण्यासंदर्भात (OTS) प्रस्ताव

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

आयुर्विमा महामंडळास सादर केला असून त्याबाबतची कार्यवाही मजीप्राच्या व शासनाच्या स्तरावर चालू केलेली आहे.

याबाबत संचालक मंडळास अवगत करण्यात आले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-**

आयुर्विमा महामंडळाला म.जी.प्रा. कडून येणे थकित असल्याने व पूर्ण देय रक्कम वेळेवर परतफेड होत नसल्याने काही प्रमाणात जमा करण्यात येत असलेली रक्कम, प्रथम व्याजापोटी समायोजित करत असल्याने, म.जी.प्रा. संचालक मंडळ दि.१.१२.२०१७ व दि.१.३.२०१८ ची कर्जपरतफेडी पोटी आयुर्विमा महामंडळास अदा करावयाची अनुज्ञेय रक्कम पुढील (OTS) प्रस्ताव मान्य होईपर्यंत स्थगित ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.८:** म.जी.प्रा. च्या मालकीच्या वेणा पा.पु. योजनेतंर्गत (ता. व जि. नागपूर) वेणा हेड वर्क्स येथील उच्चालक विहीर क्षतीग्रस्त झाल्याने करावयाच्या कायम स्वरुपी व तातडीच्या उपाय योजनांच्या अंमलबजावणीसाठी अनुक्रमे रु.३५१.५० लक्ष व रु.१०८.९० लक्ष घसारा निधीमधून वापरण्यास मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनीं संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

वेणा पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची असुन मुख्यत: आयुध निर्माण कारखाना यांना पाणी पुरवठा करण्याचे दृष्टीने सन १९६४ मध्ये योजनेस मंजूरी प्रदान करण्यात येऊन सन १९६८ मध्ये योजना कार्यान्वित करण्यात आली होती. सद्यस्थितीत आयुध निर्माण कारखाना अंबाझरी, वाडीह नगर पंचायत, देवलमेटी पेरी अर्बन ग्रामपंचायत इत्यादी भागात पाणी पुरवठा करण्यात येतो.

या पाणी पुरवठा केंद्रांतर्गत उद्धव विहीरी दि.८.७.२०१७, दि.२८.७.२०१७ दि.२५.१२.२०१७ या कालावधीत टप्प्याटप्याने क्षतिग्रस्त झालेल्या आहेत. त्यामुळे वेणा मध्यम पाटबंधारे जलाशयाचे संचय क्षेत्रात नविन शिर्ष कामे बांधणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. या प्रकरणी निविदा प्रक्रिया मुख्य अभियंता, नागपूर यांच्या कार्यालयामार्फत चालू आहे.

त्याचप्रमाणे पाणी पुरवठा खंडीत होऊ नये या दृष्टीने कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून धरणामधून पाणी वेणा हेडवर्क्स येथील अस्तित्वातील उर्ध्ववाहिनीपर्यंत उचलण्यासंबंधीच्या तातडीने अंमलबजावणी करावयाच्या उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे कायमस्वरुपी उपाययोजना व तातडीची उपाययोजना विहीत पध्दतीने ई-निविदा काढून कामाची अंमलबजावणी करण्यास, सदर कामांसाठी घसारा निधीतून वरीलप्रमाणे निधी खर्च करण्यास व सदर योजनेच्या पाणीपट्टी वसूलीतून घसारा निधीमध्ये परतफेड करण्यास मान्यता मिळण्याविषयी संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

वेणा पाणी पुरवठा योजने अंतर्गत आयुध निर्माण कारखाना, अंबाझरी यांचे राष्ट्राच्या सुरक्षेतेच्या दृष्टीने महत्वाचे केंद्र शासनाची संस्था असल्याने तेथील पाणी पुरवठा अखंडीत ठेवणे अनिवार्य आहे. तसेच वाडी नगर पंचायत व देवलामेटी ग्रामपंचायत येथील पाणी पुरवठा सुध्दा अखंडीत ठेवण्याच्या दृष्टीने उपरोक्त तात्पुरत्या व कायमस्वरुपी उपाय योजनार तातडीने होणे आवश्यक आहे. या बाबी विचारात घेऊन कायमस्वरुपी उपाय योजना व तातडीच्या उपाययोजनांसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा काढून कामाची अंमलबजावणी करण्यास, त्यासाठी अनुक्रमे रु.३५१.५० व रु.१०८.९० लक्ष इतका खर्च घसारा निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तात्पुरत्या उपाययोजनेसाठी १.०८९ कोटी याच योजनेच्या घसारा निधी मधून खर्च करण्यास व कायम स्वरुपी दुरुस्तीसाठी ३.५१५ कोटी, या योजनेच्या घसारा निधीत शिल्लक नसल्याने इतर योजनेच्या घसारा निधीतून कर्ज म्हणून देण्यास, ज्याची परतफेड ३ वर्षात करण्यात येईल, या प्रस्तावास मान्यता देत आहे.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, महाराष्ट जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.९ :** म.जी.प्रा.-मधील प्रलंबित विवक्षित कामांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून करार पध्दतीने नियुक्ती.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

मजीप्रामध्ये गट - क व गट - ड मधील पद भरती सन २००० पर्यंतच करण्यात आलेली आहे. म.शा. वित्त विभागाचे परिपत्रक दि. १ मार्च २००० अन्वये राज्य शासनाने पद भरतीवर बंदी घातली आहे. प्राधिकरणाचे परिपत्रक दि.१०.०७.२०१५ अन्वये पद भरतीवरील निर्बध यापुढेही कायम ठेवण्यात आले आहेत.

याबाबत प्राधिकरणाकडे सध्या सुरु असलेली कामे, त्यासाठी उपलब्ध असलेला कर्मचारी/ अधिकारी व आवश्यकता विचारात घेऊन, अपर मुख्य सचिव, पा.पु. व स्वच्छता विभाग यांनी निर्देश दिले की, विवक्षीत कामासाठी करारपध्दतीने गट - क मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवड करताना सामान्य प्रशासन विभागाने निश्चित केलेल्या धोरणानुसार पारदर्शक पध्दतीचा अवलंब करावा.

**ठराव :-**

वरील चर्चेअंती प्रस्तावामध्ये नमुद केलेली १० पदाच्या अनुषंगाने विवक्षित कामासाठी गट-क मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. तथापी सामान्य प्रशासन विभागाने यासाठी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवड करण्यात यावी.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यसूची बाब क्र.१० :** म.जी.प्रा. अंतर्गत विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंते यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्याबाबत.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता हे पद वर्ग-१ दर्जाचे आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्यानुसार खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अंतर्गत विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंते यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.११ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी संचालक मंडळास अवगत केले. संचालक (वित्त), यांनी संचालक मंडळास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१७-१८ चे सुधारित व सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर अवगत केले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव :-**

१) असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन २०१७-१८ चे सुधारित अंदाज व सन २०१८-१९ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

**रुपये लाखात.**

| अ.क्र. | तपशिल | सन २०१७-१८ चे सुधारित अंदाज | सन २०१८-१९ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | ५५०५६.९८ | ८१३४६.२४ |
| २. | महसुली खर्च | ६३१४७.८० | ९०००५.७१ |
| ३. | भांडवली जमा | १०४३४२.५३ | १०४३१२.८९ |
| ४. | भांडवली खर्च | १०४३४२.५३ | १०४३१२.८९ |

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अधिकारी/ कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी सन २०१७-१८ करिता रु.१६५.९४ कोटी तसेच सन २०१८-१९ साठी रु.२३९.२३ कोटी अनुदान शासनाने म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देणे बाबत शासनास विनंती करावी व पाठपुरावा करावा.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निवृत्ती वेतनधारकांच्या निवृत्ती वेतनासाठी सन २०१७-१८ करिता रु.१६०.०० कोटी तसेच सन २०१८-१९ साठी रु.२५९.४९ कोटी अनुदान शासनाने म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देणे बाबत शासनास विनंती करावी व पाठपुरावा करावा.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यसूची बाब क्र.१२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, डोंगराळ / पर्यटन क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना व पेरी अर्बन योजना म्हणून होणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या दराचा आढावा व सुधारित दरांस मंजूरी.

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

मजीप्राच्या एकूण २५ ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सध्या मजीप्रा मार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे. यापैकी ८ योजना मजीप्राच्या मालकीच्या आहेत. काही ग्रामीण योजना कार्यक्रम बाबींव्दारे देखभाल दुरुस्तीसाठी ताब्यात घेतल्या आहेत.

यास्तव संचालक मंडळाच्या दि.२९.३.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२३ व्या बैठकीत पाणी पट्टीचे दर दरवर्षी १०% वाढविण्याचा निर्णय झाला होता. मागील दरवाढ दि.१.७.२०१५ पासून लागू करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्याकडून होणारी दरवाढ (२३.०६%) पाटबंधारे विभागाकडून होणारी दरवाढ तसेच कर्मचारी, अधिकारी व निवृत्ती वेतन धारक यांच्या वेतन व भत्ते पोटी होणारी वाढ (३२%) विचारात घेता पाण्याच्या दरात वाढ करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

**ठराव :-**

१) वरील सर्व बाबींचा विचार करता, सदर प्रस्तावातील परिशिष्ट १ ते १२ प्रमाणे पाण्याचे दर सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी किमान दर ० ते १०००० लीटर साठी लागू करावे.

३) यापुढे पाणीपट्टीला विजदरामध्ये होणारी वाढ, मजूरीवर होणारी वाढ इत्यादीशी निगडीत जोडलेले निर्देशांक (Index) तयार करुन पुढच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करावे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यसूची बाब क्र.१३ :** म.जी.प्रा. च्या नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या वसाहतीच्या ग्राहकांना पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या जलवाहिन्यांच्या तसेच तत्सम कामासाठी विकासकाकडून भांडवली अंशदान घेण्यासाठी.

**भांडवली अंशदानाच्या दरामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

मजीप्राच्या मालकीच्या राज्यातील २५ पाणी पुरवठा केंद्रातून सहकारी गृह निर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील बिल्डर्समार्फत उभारण्यात येणाऱ्या निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्यासाठी भांडवली अंशदान लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय, मजीप्रा संचालक मंडळाच्या २३ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या १३७ व्या बैठकीत घेण्यात आला आहे.

यानुषंगाने सादर करण्यात येत असलेला प्रति सदनिका परिगणित केलेला अंशदानाचा दर प्रतीघनमीटर असा जरी असता तरी, पाणी पुरवठ्याच्या प्रमाणानुसार ग्राहकाकडून आकारण्यात येणारी पाणीपट्टी ही घनमीटर एककानुसार असल्याने भांडवली अंशदानाचा दर हा तांत्रिकदृष्ट्या प्रती घनमिटर या एककानुसार आकारणे योग्य राहील. यानुषंगाने सदर प्रस्ताव संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. या विषयावर सविस्तर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नागरी पाणी पुरवठा केंद्रांच्या बाबतीत तसेच निमशहरी पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत नवीन /वाढीव नळजोडणी देताना, निवासी वसाहतींकडून पुढील तक्त्यानुसार भांडवली अंशदान घेण्यास मान्यता प्रदार करण्यात येत आहे.

| सद निका / बंगलो / चाल इत्यादींचे बांधकाम क्षेत्रफळ (**Built up Area**) चौ.फूट मध्ये. | भांडवली अंशदानाची रक्कम. |
|---|---|
| ०-५०० | रु.३,०००/- |
| ५०१-१००० | रु.५,०००/- |
| १००१-१५०० | रु.७,५००/- |
| १५०१-२००० | रु.१०,०००/- |
| २००१-२५०० | रु.१२,५००/- |
| २५०१ व त्यापेक्षा जास्त. | रु.१५,०००/- |

यासंदर्भात मजीप्राच्या दि.२७.१०.२०१६ च्या जा.क्र.मजीप्रा/वित्त-२/अं.प.परिव्यय/ भांडवजी अंशदानदर/ ५८ अन्वये निर्गमीत करण्यात आलेले परिपत्रक रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यसूची बाब क्र.१४ :** वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना ,ता .पनवेल,जि.रायगड
**मजीप्राची योजना म्हणून राबविण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत.**

सदर प्रकरणी सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले,

सिडको, जे.एन.पी.टी., पनवेल महानगरपालिका, एम.एम.आर.डी.ए., व विशेष आर्थिक क्षेत्र यांचेकडून वाढीव पाण्याची मागणी विचारात घेता वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा ३-मजीप्राची योजना म्हणून राबविण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करण्यात आला.

सदर योजनेकरीता सिडको, जे.एन.पी.टी., पनवेल महानगरपालिका, एम.एम.आर.डी.ए., व विशेष आर्थिक क्षेत्र या ग्राहक संस्थांनी वित्तीय सहभागा संदर्भात संमती दर्शविली आहे. या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची रु.१९५.९६ कोटी इतकी रक्कम घसारा/ स्वनिधीतून उपलबध करुन देणेबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

हुडको कर्जाचा व्याज दर हा साधारणपणे १०% द.सा.द.शे आहे. त्या तुलनेत मजीप्राकडून स्वत:चा निधी विविध बँकामध्ये अल्प व दिर्घ मूदतीसाठी गुंतविला जातो व त्यासाठी साधारणपणे ६.५० ते ७.००% इतके व्याज मजीप्रास प्राप्त होते. या योजनेचा वित्तीय विष्लेशन केल्यास आंतरिक परतावा हा 14% पेक्षा जास्त आहे. सदर बाब विचारात घेतल्यास, बाह्य वित्तीय संस्थेकडून कर्ज न घेता, मजीप्राचाच निधी कर्ज म्हणून या योजनेसाठी उपलब्ध करुन दिल्यास व बाह्य वित्त सहाय्याच्या व्याज दरावर आधारित येणाऱ्या दायित्वानुसार पाणीपट्टीची आकारणी केलयास मजीप्रास सदरचा प्रस्ताव किफायतशीर असल्याची चर्चा झाली

त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :**

१. अस्तित्वातील न्हावा शेवा पाणी पुरवठा केंद्रातून अस्तित्वातील ग्राहकांनी त्याचबरोबर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मजीप्राकडे पाण्याची वाढीव मागणी केली आहे. त्यानुसार सदरची एकूण मागणी २२८ द.ल.लि. इतकी आहे. तथापि, सदर मागणी पूर्ण करण्यासाठी अस्तित्वातील न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेतील बऱ्याच उपांगांचे आयुर्मान संपुष्टात आल्याने, तसेच उपांगांची क्षमता वाढविणे आवश्यक असल्याने, सदर योजना सक्षम नाही. त्यामुळे २२८ द.ल.लि. क्षमतेची पाणी पुरवठा योजना राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदरची योजना "वाढीव न्हावा शेवा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३" म्हणून व "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना" म्हणून हाती घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. सहभागी ग्राहक संस्थेच्या पाणी मागणीनुसार अंशदानासाठी आवश्यक रक्कम प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक तो करारनामा करण्यात यावा.

४. सहभागी ग्राहक संस्थांसोबत करारनामा करताना पाण्याचे दर स्पष्टपणे नमूद करावेत व ते सध्याच्या प्रचलित दरापेक्षा कमी असू नयेत .

५. सहभागी सर्व ग्राहक संस्थेच्या पाणी मागणीनुसार अंशदानासाठीचा शक्यतो पहिला हप्ता प्राप्त झाल्यावरच योजनेचे कार्यादेश देण्यात यावेत .

६. सदरची योजना ३६ महिन्यात पूर्ण करण्याच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्यात यावे.

७. मजीप्राच्या हिश्याची रु.१९५.९६ कोटी रक्कम घसारा/स्व निधीमधून उपलब्ध करण्यात यावा.

यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा .सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


क्र.मजीप्रा-२०१८/सभा-१४१/(१०)/आ.४/ ५२/२०१८ दिनांक : १६.४.२०१८

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.२७ मार्च, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४१व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दि.२७ मार्च, २०१८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४१व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

१६.४.१८

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

प्रत : खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.
प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.
उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.
उप मुख्य लेख्याधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.